


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!





संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३२५ वा | सोमवार दि २३ मार्च २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# एसीबीच्या गळाला टेकाळे नावाचा मासा लागेना! अवैध संपत्तीचे पुरावे देऊनही चौकशी यंत्रणा करेना!

**जनसंचलन/बुलढाणा**

तत्कालीन महसूल मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे या महा भ्रष्टाचाऱ्याची पुराव्यानिशी तक्रार दाखल करून त्यांच्या नावे असलेल्या करोडो रुपयांच्या संपत्तीची खूली चौकशी मागील काही महिन्यांपासुन सुरू होऊनही अद्याप पर्यंत तत्कालिन मंडळ अधिकारी महाभ्रष्टचारी विजय टेकाळेंवर शासकीय कारवाई करण्यास एवढी दिरंगाई का असा प्रश्न सुज्ञ नागरिकांमध्ये जोर धरीत आहे. करण्याची मागणी तक्रारदाराने आता एसीबीला स्मरणपत्रे,विनंती अर्ज,दिले असून कारवाईचा घोडा कुठे अडला? हा प्रश्ननिर्माण झाला आहे. पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा व पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बुलडाणा यांना बुलडाण्याचे तत्कालीन वादग्रस्त मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे, त्यांची पत्नी ज्योती विजय टेकाळे व त्यांचे इतर नातेवाईक यांचे नावे असलेल्या करोडो रुपयाच्या संपत्तीची खुली चौकशी करणेबाबत ६ फेब्रवारी २०२३ व २९ एप्रिल २०२४ रोजी एका तक्रारदाराने तक्रार अर्ज दाखल केले होते. आता ७ जानेवारी २०२५,२६ रोजी स्मरण पत्र देण्यात आले.या तक्रारीत म्हटले आहे की,बुलडाणा येथील मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे, त्यांची पत्नी ज्योती विजय टेकाळे व त्यांचे इतर नातेवाईक यांचे नावे असलेल्या करोडो रुपयाच्या संपत्तीची खुली चौकशी करणे करिता सर्व पुराव्यानिशी यापूर्वीच तक्रार अर्ज सादर केलेले आहेत.मात्र बराच अवधी लोटून गेला असून त्यावर आजपावेतो कोणतीच कार्यवाही झालेली दिसून आलेली नाही.आतापर्यंत अर्जावर नियमाप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये आपल्या स्तरावरुन संबंधीतांच्या संपत्तीची चौकशी केली किंवा नाही ? याबाबत तक्रारदाराला नियमानुसार कोणतीही माहिती दिली नाही. त्यामुळे हा मासा एसीबीच्या गळाला केव्हा लागेल? याकडे अनेकांचे लक्ष केंद्रित आहे. आणि भ्रष्टाचार चव्हाट्यावर कधी येईल




पाठपुरावा
सिटी न्युज & दैनिक जनसंचलन
रद्द झालेले फेरफार पुन्हा कसे मंजूर झाले ?
फेरफारांचा काय गोडबंगाल ?
अजून बरेच काही...




**तत्कालीन बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी भ्रष्टाचारातून कमावलेली करोडो रुपयांची शेकडो सातबारे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई,अमरावती व बुलडाणा यांच्याकडे देऊनही अद्याप पर्यंत कारवाई संत गतीने भ्रष्टाचारातून कमावलेली करोडो रुपयांची चल - अचल संपत्तीचे शेकडो सातबारे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) ला देऊनही तत्कालीन बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्यावर कारवाईस संबंधित प्रशासन हतबल का असा प्रश्न जोर धरीत आहे**

अजून बरेच काही पुढील भागात

# जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचा धडाकेबाज निर्णय भेसळखोरांची दुकाने सील होणार!

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात भेसळयुक्त खवा आणि पनीर विक्रीचा घाणेरडा प्रकार उघडकीस येताच प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी भेसळखोर उत्पादक आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाईचे स्पष्ट आदेश देत थेट इशारा दिला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या जिल्हा दूध भेसळ नियंत्रण समितीच्या बैठकीत धक्कादायक माहिती समोर आली. पाम तेल, साखर आणि स्किम्ड मिल्क पावडर वापरून बनवलेला बनावट ङ्मखवाफ आणि ङ्मचीज ॲनालॉगफ पनीर म्हणून विकला जात असल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे, हे पदार्थ गुजरातमधून स्पेशल बर्फी किंवा हलवा नावाखाली मोठ्या प्रमाणावर जिल्ह्यात येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ सुरू असल्याचा संताप व्यक्त होत आहे. नियमांनुसार, अशा पदार्थांवर त्यातील घटकांची स्पष्ट माहिती देणे बंधनकारक असतानाही अनेक विक्रेते ग्राहकांची फसवणूक करत असल्याचे समोर आले आहे. यामुळे आता अन्न व औषध प्रशासनाला तात्काळ कारवाईचे आदेश देण्यात आले असून, हॉटेल, रेस्टॉरंट आणि मिठाई दुकानदारांना मेनूवर स्पष्ट माहिती देणे सक्तीचे करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी नागरिकांनाही सतर्क राहण्याचे आवाहन करत, खरेदीपूर्वी लेबल तपासण्याचा सल्ला दिला आहे. संशयास्पद अन्नपदार्थ दिसल्यास त्वरित १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



# अभिनयातला अर्थ आणि सारांशही!



एनएसडीतून इथं परत आल्यानंतर एखाद वर्षाने नसिर (नसिरुद्दिन शहा), ओम (ओम पुरी) वगैरे मुंबईत आले. त्यांच्याबरोबरच्या भेटीगाठींतून असा विचार पुढे आला, की आपण एनएसडीची मुलं मिळून काहीतरी एकत्र करू या. मग आम्ही आमचा एक ङ्कमजमाफ नावाचा ग्रुप तयार केला. आम्ही दोघं, ओम, नसिर, रूपकुमार राजदान, कविता चौधरी असे बरेचजण यासाठी एकत्र आलो. आम्ही गो. पु. देशपांडे यांचं ङ्कउद्ध्वस्त धर्मशाळाफ हे नाटक हिंदीत करायचं ठरवलं. वसंत देव यांनी त्याचं हिंदी रूपांतर केलं होतं. त्यावेळेस पृथ्वी थिएटर नव्यानेच सुरू झालं होतं. तिथंही आमचे प्रयोग झाले. मग हिंदीत ङ्कबिच्छूफ केलं, ङ्कगिधाडेफ केलं. अशी आमची मुशाफिरी सुरू होती. नसिर, ओम आणि सईद मिर्झा हे तिघे पुण्यात एफटीआयला एकत्र होते. सईद मिर्झा, अझीझ मिर्झा, सुधीर मिश्रा अशा उगवत्या दिग्दर्शकांनी त्यांची ङ्कयुक्तफ नावाची एक संस्था स्थापन केली. ङ्कयुक्तफ्तर्फे एखादी फिल्म करू या असं त्यांनी ठरवलं. मी पुण्याची असल्यामुळे या सगळ्यांना पुण्यात भेटत होते, त्यामुळे ओळख होती. ङ्कयुक्तफबॅनरअंतर्गत सईदने त्याची पहिली फिल्म केली ङ्कअरविंद देसाई की अजीब दास्ताँफ. या चित्रपटासाठी सईदने ङ्कतू आई किंवा अरविंद देसाईची बहीण यापैकी कोणती भूमिका करशील?फ, असं मला विचारलं. मी लगेच बहिणीचा रोल करेन असं सांगितलं. माझे चारच सीन होते. हा माझा पहिला चित्रपट. सतीश शहाचाही हाच पहिला चित्रपट होता. चित्रपटात काम करण्याचा वेगळा अनुभव या निमित्ताने मला घेता आला. अभिनय हा कोणत्याही माध्यमासाठी अभिनयच असला, तरी तो व्यक्त करण्याचं तंत्र वेगवेगळं असतं. चित्रपटासाठी कॅमेरा तीन फुटांवर असतो, त्यामुळे रंगमंचावर तुम्ही करत असलेल्या अभिनयाप्रमाणे तिथं अभिनय करता येत नाही. ङ्कअरविंद देसाई की अजीब दास्ताँफझाल्यावर मग सईद मिर्झाने मला त्याच्याच १९८०मध्ये आलेल्या ङ्कअल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यूँ आता हैफ या चित्रपटासठी विचारलं. त्यात तर माझा केवळ एकच सीन होता. त्यानं खूप आग्रह केला त्यात काम करण्याचा. १९८१मध्ये ङ्कचक्रफ चित्रपट केला. चौथा चित्रपट होता ङ्कगांधीफ. गांधीचं चित्रीकरण आटोपून आम्ही सगळे परत मुंबईत आलो आणि जरा दम खात होतो, तोच एक दिवस मला किरण वैराळे भेटली. ती ङ्कअर्थफ्मध्ये शबाना आझमीची मैत्रीण झाली होती. मला म्हणाली, ङ्कअगं कुठे आहेस तू?, तुला महेश भट शोधतोय.फ मला काहीच कळेना. त्याच्याआधी रमण कुमार हा जयदेवचा मित्र एकदा घरी आला असताना, त्यानं सांगितलं, की ङ्कशबाना का मेसेज आएगा तुम्हें, एक रोल है मना मत करना.फ कुठला रोल याविषयी काहीच कल्पना त्यानं दिली नव्हती. मग तो म्हणाला, ङ्कमहेश भट कर के एक है, वो शायद तुम्हें कॉन्टॅक्ट करेगा.फ नेमका किरणनेही मला हाच संदर्भ दिला. मी महेशला भेटले आणि रोल करते असं सांगितलं. कस्तुरबासारखी व्यक्तिरेखा आपण साकारलीय म्हणजे आपण आता मोठ्ठे स्टार झालो आहोत आणि छोटेमोठे रोल घ्यायचे नाहीत, असं काहीही माझ्या डोक्यात नव्हतं. चांगले रोल करायला मिळावेत हीच इच्छा होती. ङ्कअर्थफ हा चित्रपट यासाठी महत्त्वाचा ठरला. आमच्याकडे पुण्याला शांताबाई नावाच्या घरकामासाठी यायच्या. ङ्कअर्थफ्मध्ये मी नऊवारी नेसलेली असताना, घरकाम करताना साडी वर घेऊन ती कंबरेला खोचते, ती स्टाइल मी शांताबाईंची पाहून शिकले. मी सेटवर गेल्यावर कपडे विचारले तर ती नऊवारी साडी दिली गेली आणि संवाद दिले मैथिली भाषेतले. झोपडपट्टीत राहिलेली मराठी बाई ङ्कसिंदूरफ वगैरे शब्द कसे म्हणेल? तुमचा वेश, राहणीमान, व्यक्तिरेखा या सगळ्याला साजेशी भाषा हवी, लकबी हव्यात ना. महेशच्या डोक्यात नऊवारी नेसलेली बाई होती. मग मी त्याला ती मध्येमध्ये मराठी बोलेल वगैरे सांगितलं. ते महेशला पटलं. मग जवळजवळ प्रत्येक सीनच्या वेळी तो सहायकाला सांगायचा, ङ्करोहिणीजी से पुछो क्या करना है.फ हा चित्रपट पूर्ण झाला आणि प्रेक्षकांनी तो चांगला उचलून धरला. मग जितेंद्रच्या आईचा रोल केला आणि मग सगळे तसेच रोल यायला लागले. याच दरम्यान, पुन्हा महेशने संपर्क केला आणि ङ्कसारांशफ्ची कथा ऐकवली. ङ्कएक बुढा-बुढी हैफ अशी त्यानं सुरुवात केल्याकेल्याच मी म्हणाले, ङ्कमहेश, प्लीज मला पुन्हा बुढ्ढीचा रोल नको देऊ, मी वैतागलीय.फ महेश म्हणाला,रोहिणी तुम स्टोरी सुन लो, बाद में तय करना.फ स्टोरी ऐकल्यावर मात्र मी हो म्हणाले. या चित्रपटाचं शूटिंग सलग झालं. त्यामुळे आम्ही चौघं (अनुपम, मी, मदन जैन आणि सोनी) सतत एकत्र होतो. महेशच्या डोक्यात चित्रपटाविषयीचं चित्र अत्यंत स्पष्ट असतं. त्यामुळे तो प्रभावही आम्हा चौघांवर पडला आणि सगळ्यांच्याच भूमिका सुरेख झाल्या. त्यात निळूभाऊसुद्धा ( निळू फुले ) होते. इथं मला लक्ष वेधावंसं वाटतं, की एखाद्या व्यक्तिरेखेचा स्लॉट मोकळा होतोय असं लक्षात आल्यावर आपली इंडस्ट्री एखाद्या कलाकाराला त्या स्लॉटमध्ये बसवून टाकते. तसं काहीसं माझं झालं, असं मला वाटतं. एकदा मी बासू भट्टाचार्य यांना म्हणाले होते, की ङ्काय हो, मला सारखं सारखं पोक्त भूमिका, म्हाताऱ्या बाईची भूमिका देतात.फ ते म्हणाले होते, ङ्करोहिणी, तुम और संजीव कुमार दोनो रिलाएबल हो. म्हणजे तुम्हाला दिलेलं काम तुम्ही चोख कराल, असा आम्हाला विश्वास असतो. म्हणून तुला ङ्कयंग टू ओल्डफ असा आलेख असलेले रोल मिळतायतफ. अर्थात असं त्यांनी गंमतीनं सांगितलं होतं. त्या वेळेस निरुपमाजी कमी काम करत होत्या, सुलोचनाबाई देखील कमी काम करत होत्या, अचला सचदेव यासुद्धा मोजकं काम करत होत्या. म्हणजे आईचा स्लॉट रिकामा होत होता आणि मला त्या रिकाम्या होऊ घातलेल्या आईच्या स्लॉटमध्ये बसवूनच टाकलं. मग रिमा आली आणि तिनं यंग मदरचा स्लॉट भरून काढला.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# महाराष्ट्र नेक्स्ट’ वेबसाईट नेमकी काय आहे? राज ठाकरेंनी पाडवा मेळाव्यात सविस्तर सांगितलं



**मुंबई/वृत्तसंस्था :** गुढीपाडव्याच्या निमित्ताने आयोजित मेळाव्यात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी 'महाराष्ट्र नेक्स्ट' (Maharashtra Next) ही नवी वेबसाईट लाँच केली आहे. सोशल मीडिया आणि राजकारणातील अनावश्यक वादात वेळ न घालवता तरुणांनी विकासात्मक प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. "केवळ कौतुक करण्यापेक्षा ठोस आणि नवे विचार मांडा," असे सांगत राज ठाकरे यांनी या वेबसाईटची घोषणा केली. सामान्य नागरिकांच्या संकल्पना तज्ज्ञांमार्फत सरकारपर्यंत पोहोचवणारा एक दुवा म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

यावेळी राज ठाकरे म्हणाले की, "ते विकास आराखड्याचं काय झालं, कुठपर्यंत आलं? प्रत्येक पत्रकार परिषदेमध्ये असताना किंवा नंतर हे प्रश्न असायचेच. २०१४ मध्ये जेव्हा ब्लूप्रिंट आणली, तिथपासून आज २०२६ या क्षणापर्यंत मला एकाही पत्रकाराने हा प्रश्न विचारला नाही की, त्या ब्लूप्रिंटमध्ये नेमकं आहे काय? कारण ती वाचण्यात कोणाला इंटरेस्ट नव्हता, फक्त हिणवण्यात होता. असो, काळ लोटला आणि आज त्या गोष्टीला जवळपास १२ वर्षे होऊन गेली आहेत. त्यावेळेला अनेक तज्ज्ञांना बरोबर घेऊन अनेक गोष्टी त्यामध्ये मांडल्या होत्या. गेल्या १२ वर्षांमध्ये महाराष्ट्र खूप बदलला, विचारांतही महाराष्ट्र बदलला."पुढे बोलताना त्यांनी सांगितलं की, "मी अनेकदा वर्तमानपत्रांत काही लेख वाचत असतो, त्यात अनेक चांगल्या सूचना येतात. नवीन काहीतरी निर्माण करण्यासाठी अनेक संकल्पना मांडल्या जातात. मग मी विचार केला की, या सगळ्या गोष्टींसाठी आपल्याला एक व्यासपीठ उभं करायला लागेल. महाराष्ट्रातील किंवा महाराष्ट्राबाहेरील लोकांना 'नेमकं काय व्हायला पाहिजे', 'काय घडलं पाहिजे' आणि 'ते कसं घडलं पाहिजे', याबद्दल अनेक योजना त्यांच्याकडे तयार आहेत. परंतु या सांगायच्या कुणाला? मांडायच्या कुणाकडे? सरकार म्हणजे नेमकं कोण? बोलायचं कोणाशी? मांडल्यानंतर ते बघणार कोण आहे आणि आम्हाला उत्तर कधी मिळणार? या सगळ्या प्रश्नांचा विचार करून मी एक नवीन वेबसाईट महाराष्ट्राला अर्पण करत आहे.""या वेबसाईटवर तुम्ही तुमचे विचार मांडू शकता. पण तिथे 'जय महाराष्ट्र साहेब', 'भावी मुख्यमंत्री तुम्हीच' असले काहीही चालणार नाही; अशा गोष्टींना तिथे स्थान नाही. तिथे नवा विचार करा. या मोबाईलच्या विळख्यातून बाहेर या, या कर्मणुकीच्या गटारगंगेतून बाहेर या. हा तुम्हा-आम्हालाच महाराष्ट्र उभा करावा लागेल, तुम्हा-आम्हालाच महाराष्ट्र वाचवावा लागेल आणि त्यासाठीच हे पहिले पाऊल आहे. म्हणूनच आज मी तुमच्यासमोर 'महाराष्ट्र नेक्स्ट' (महाराष्ट्र नेक्स्ट ) उभा करत आहे." असं राज म्हणाले."ही वेबसाईट सुरू झाल्यावर तुम्हाला मराठी आणि इंग्रजी असे दोन पर्याय मिळतील. मराठीमध्ये गेल्यावर बाजूला एक ऑडिओ फिल्म आहे, जी ही वेबसाईट कशी वापरायची हे सांगते. आपल्या कल्पना नोंदवण्यासाठी मी २७ विषय दिलेले आहेत. ज्या काही तुमच्या स्वतःच्या कल्पना असतील, जे काही नवीन निर्माण करायचे असेल, ते तुम्ही तिथे मांडू शकता. आम्ही तुमच्यामध्ये आणि सरकारमध्ये फक्त वाहक (Bridge) असू. जर तुमची कल्पना योग्य असेल, तर ती सरकारकडून कशी करून घ्यायची, हे आम्ही पाहू. कारण तुमचे विचार आधी तज्ज्ञांकडे जातील आणि त्या कमिटीकडून मंजूर झाल्यानंतर ते सरकारकडे पाठवले जातील."

## अशोक खरातचा भंडाफोड कसा झाला? मुख्यमंत्र्यांनीच सांगितलं



**नागपूर/वृत्तसंस्था :** खरात प्रकरणाने राज्याच्या राजकारणात आणि प्रशासनात मोठी खळबळ उडवली असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणावर ठाम भूमिका घेत सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. खरात याचे प्रकरण अत्यंत गंभीर असून इंटेलिजन्सच्या आधारे आम्ही याचा भांडाफोड केला आहे. या प्रकरणात कोणालाही वाचवले जाणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. "या प्रकरणाला राजकीय रंग देऊ नये, विरोधी पक्षाचे कोण कोण त्याच्याकडे गेले याचे पुरावे मी देऊ शकतो, सर्वात जास्त तर माझ्याकडे पुरावे आहेत याचे, पण ते पोलिसांकडे आहेत, ते पोलिसांचे काम आहे, माझे नाही," असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी म्हटलं आहे.मुख्यमंत्र्यांनी म्हणाले की, अशोक खरात प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर काटेकोरपणे मॉनिटरिंग सुरू आहे. राज्याच्या पोलिस महासंचालकांनाही (डीजी) विशेष सूचना देण्यात आल्या असून नाशिक पोलीस आणि एसआयटी यांच्या माध्यमातून सखोल तपास सुरू आहे. तपासात कोणतीही तडजोड केली जाणार नसून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तर या प्रकरणात आणखी काही महिला पुढे आल्याने प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. अनेक महिला सामाजिक दबाव, भीती आणि बदनामीच्या कारणामुळे आतापर्यंत पुढे येत नव्हत्या. मात्र आता त्यांना धीर देऊन पुढे आणण्याचे प्रयत्न सुरू असून काही प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. महिलांना न्याय मिळवून देणे हेच सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे त्यांनी सांगितले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, हवेत बोलण्याला काही अर्थ नाही.

## अध्यक्षपदाच्या निवडणुकीनंतर साताऱ्यात महायुतीत तणाव

**सातारा :** जिल्हा परिषद अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत पाच सदस्यांची फोडाफोडी करून भाजपने सातारा जिल्हा परिषदेवर भगवा फडकवला. त्यावेळचा हाय व्होल्टेज ड्रामा संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला. मात्र, त्यानंतर महायुतीत तणाव निर्माण झाला आहे. प्रशासनाला हाताशी धरून भाजपने लोकशाहीचा मुडदा पाडल्याचा आरोप पालकमंत्री शंभूराज देसाईंनी केला होता. त्याला भाजप नेत्यांनी आज प्रत्युत्तर दिलं. अध्यक्षपदाची निवडणूक ही लोकशाही पद्धतीने झाली आहे. लोकशाहीचा गळा घोटलेला नाही. अपयश झाकण्यासाठी पालकमंत्री खोटे आरोप करत आहेत, असे स्पष्टीकरण शिवेंद्रराजे भोसले यांनी दिले आहे.



जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणुकी दिवशी जिल्हा परिषद साध्या वेशातील पोलिसांनी भरली होती. राष्ट्रवादीच्या सदस्याचे अपहरण केल्याची खोटी फिर्याद गुरुवारी रात्री दाखल करण्यात आली. त्यासंदर्भात स्वतः सदस्याने पोलीस ठाण्यात हजर होऊन आपला जबाब नोंदवला. त्यानंतर निवडणुकी दिवशी सकाळी फिर्याद दिली. त्यात अनिल देसाई, संदीप मांडवे या दोन जिल्हा परिषद सदस्यांसह इतर दोघांची नावे घातली. आम्ही ते दोन सदस्य आणि कामेश कांबळे यांना घेऊन जात असताना पोलिसांनी बळाचा वापर करून देसाई आणि मांडवेंना ताब्यात घेतले. तर कामेश कांबळेला मंत्री शिवेंद्रराजे भोसलेंनी दम दिला. जिल्हा परिषदेची काहीही संबंध नसताना त्याठिकाणी उपस्थित असलेल्या नगराध्यक्ष अमोल मोहिते आणि नगरसेवक फिरोज पठाण यांनी कामेशला आमच्या ताब्यातून बाजूला नेल्याचा आरोप शंभूराज देसाईंनी केला होता. जिल्हा परिषदेत साध्या वेशातील शेकडो पोलीस होते. त्यांनी मी पालकमंत्री असताना माझ्यासह मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांना मागे रेटले आणि धक्काबुक्की केली. सभागृहाच्या बाहेरच पोलिसांनी सदस्यांना ताब्यात घेतले. प्रशासनाला हाताशी धरून भाजपने लोकशाहीची हत्या केली आहे. सत्तेच्या जोरावरची दादागिरी, मग्रुरी आणि माज दाखवला असल्याची जोरदार टीका देखील शंभूराज देसाईंनी केली होती. तसेच या निवडी विरोधात सर्वोच्च न्यायालयापर्यंत दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. भाजप नेत्यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. लोकशाही पद्धतीनेच भाजपची सातारा जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन झाली आहे. राजकीय अपयश झाकण्यासाठी पालकमंत्री खोटे आरोप करत असल्याचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले म्हणाले. भाजपचे वरिष्ठ नेते या निवड प्रक्रियेपासून चार हात लांब होते. लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम इथे अजिबात झाले नसल्याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले.विरोधक जर जिंकले तर ती लोकशाही आणि भाजप जिंकला तर ती दांडगाई. हा कुठला न्याय, असा सवाल शिवेंद्रराजेंनी विरोधकांना केला. आमच्या कोणत्याही मंत्र्यांचे वाहन जिल्हा परिषदेच्या आवारात नव्हते. आमच्या विचाराचे काही सदस्य शिवसेना आणि राष्ट्रवादीने दबावाखाली ठेवले होते. सभागृहात ज्या सदस्यांनी आम्हाला मतदान केले ते जर त्यांच्याशी एकनिष्ठ होते तर मतदान आम्हाला का केले? याचा अर्थ दबाव त्या सदस्यांवर होता.

# चाकणकर यांना सहआरोपी करुन तातडीने अटक करा : रुपाली ठोंबरे





**पुणे/वृत्तसंस्था :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदाच्या राजीनामा दिलेल्या रुपाली चाकणकर यांच्या अटकेची मागणी केली. "रुपाली चाकणकर यांचा भोंदूबाबा अशोक खरात याच्या प्रकरणात राजीनामा घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा राजीनामा घेतल्याबद्दल आम्ही त्यांच्या आभारी आहोत. आता चाकणकरांना तात्काळ अटक केली पाहिजे. या रॅकेटच्या शेवटच्या धागापर्यंत पोहोचून या सगळ्यांना शिक्षा होण्यासाठी सर्व गोष्टींची चौकशी होणं गरजेचं आहे. रुपाली चाकणकर यांना सहआरोपी करुन तातडीने अटक करणं गरजेचं आहे", अशी भूमिका रुपाली ठोंबरे पाटील यांनी मांडली. महाराष्ट्रातील माता-भगिनींवर जे अन्याय, अत्याचार झाले त्याला कारणीभूत राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर आहेत. त्यामुळे त्यांना तातडीने अटक करावी. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या रुपाली चाकणकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्ष पदावरुन पायउतार करण्याबाबत लवकरच निर्णय घेतील. कारण या प्रकरणामुळे पक्षाची बदनामी होत आहे. सरकारची बदनामी झाली आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी तातडीने महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा घ्यायला सांगितला. आता पक्षाच्या अध्यक्षा देखील चाकणकरांचा राजीनामा घेतील. ही मागणी सर्व पदाधिकाऱ्यांची आहे", असं रुपाली ठोंबरे पाटील म्हणाल्या."मी आरोप केलेले नाहीत, तर रुपाली चाकणकर यांच्या गुरुने महिलांचा शोषण केलं आहे, तर चाकणकर यांनी या भोंदू बाबाला पदाचा गैरवापर करुन मदत केली. ते मी जगासमोर आणलं आहे. ते मी कोर्टासमोर आणणार आहे. तुम्हाला कोणत्या नोटीस पाठवायच्या आहेत ते पाठवा. मी पुरावे देणार. तुमचे काय संबंध होते त्याचे पुरावे देणार. अशीच धमकी त्यांनी खबरदार पुढारीच्या पत्रकाराला दिली होती ज्यांनी या भोंदू बाबाचा भंडाफोड केला होता. त्याचवेळी ह्यांनी कारवाई केली असती तर आज एवढ्या महिला बळी पडल्या असत्या का?", असा सवाल रुपाली ठोंबरे पाटील यांनी केला. रुपाली चाकणकर यांचा 2016 पासून अशोक खरात हा गुरुमाऊली आहे. त्या 2016 पासून त्यांची छत्री धरतात, पाय धरतात, अजून केक खायला घालतात. आम्हाला अडचण नाही. पण वर्षभरापूर्वी या भोंदू बाबाचा भंडाफोड झाला तेव्हा त्यांनी या भोंदूबाबावर कारवाई का नाही केली? तेव्हा तर तुम्ही महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर होता. तेव्हा तुम्हीला पोलिसांना कडक कारवाईचे आदेश का नाही दिले?", असादेखील सवाल रुपाली पाटील यांनी केला. रुपाली चाकणकर यांना या सगळ्या गोष्टींची माहिती होती की, त्यांचा गुरु हा भोंदूबाबा हा विकृत चाळे करतो. अत्याचार करतो. हे माहिती असूनसुद्धा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा मूग गिळून गप्प बसल्या होत्या. पीडितेची बाजू न घेता त्यांनी पोलिसांना पत्र दिले आहेत. गुन्हाचा तपास होऊ नये यासाठी दबाव टाकला आहे. रुपाली चाकणकर यांनी भोंदूबाबाला वाचवण्यासाठी तपासात अडथळे निर्माण केले. त्यामुळे त्यांनी नैतिकतेच्या, कायदा याबद्दल बोलू नये. कोणी बदनामी केली? तुम्हीच बदनाम झाले. पाठवा नोटीस. काय व्हायचं ते होऊ दे",, अशा शब्दांत रुपाली ठोंबरे पाटील यांनी निशाणा साधला.

# मम्मी, पप्पा...मला माफ करा; शिवाजी विद्यापीठात २३ वर्षीय इशिताने जीवन संपवलं, शेवटची चिठ्ठी सापडली!

**मुंबई :** शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या वसतिगृहात एक धक्कादाक घटना घडली आहे. ऑगस्ट महिन्यात एका विद्यार्थीनीने वसतिगृहात आत्महत्या करत आपले जीवन संपवले होते. या घटनेला काही महिने उलटतात तोच आता पुन्हा एका विद्यार्थिनीने वसतिगृहातच पंख्याला दोरीने गळफास घेत आत्महत्या केली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहात शुक्रवारी (21 मार्च) रात्री ही घटना उघडकीस आली. इशिता मधुसुदन सावंत (वय 23, रा. गोवा) हिने छताच्या हुकाला नायलॉन दोरीने गळफास घेऊन जीवन संपविले. शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. द्वितीय वर्षातील ती विद्यार्थिनी होती. वसतिगृहातील वॉर्डन शीला यशवंत सोनवणे यांच्या ही घटना लक्षात आल्यामुळे त्यांनी गळफास सोडवण्याचा प्रयत्न केला, तरी उपचारापूर्वीच



तिचा मृत्यू झाला. राजारामपुरी पोलिस ठाण्यात आत्महत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस तपास करत आहेत. गेल्या वर्षभरात विद्यापीठात विद्यार्थिनीची ही दुसरीच अशी घटना घडली आहे.इशिता मधुसुदन सावंत ही शिवाजी विद्यापीठात मानसशास्त्र विभागात एम. ए. द्वितीय वर्षात शिकत होती. वसतिगृहातील खोली क्रमांक 30 मध्ये ती चार मैत्रिणींसह राहत होती. मात्र गुढीपाडव्याच्या सुट्टीमुळे इतर मैत्रिणी परगावी गेल्या असल्याने ईशिता शुक्रवारी दिवसभर एकटीच खोलीत होती. वॉर्डन शीला यशवंत सोनवणे यांना रात्री 11 वाजता नियमित तपासणीवेळी ईशिताच्या खोलीचा दरवाजा आतून बंद असल्याचे दिसले. त्यांनी दरवाजा ठोठावून बघितले तसेच दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.काही विद्यार्थिनींनी खिडकीतून आत डोकावले. त्यांना आतमध्ये इशिता छताच्या फॅनच्या हुकाला नायलॉन दोरीने गळफास लावून घेतल्याचे दिसले. वॉर्डन सोनवणे यांनी तात्काळ कर्मचाऱ्यांना मदतीने गळफास सोडवण्यात यश मिळविले. बेशुद्ध अवस्थेतील इशिताला सी.पी.आर. शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे डॉक्टरांनी तपास केल्यानंतर ती उपचारापूर्वीच मृत झाल्याचे घोषित केले.

याबाबत राजारामपुरी पोलिसांत घटनेची नोंद करण्यात आली आहे. राजारामपुरी पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पुरावे गोळा केले. उत्तरीय तपासणीनंतर पहाटे नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही.तपासादरम्यान पोलिसांना एक चिठ्ठी देखील इशिताच्या खोलीतून हाती लागली आहे. 'मिस यू डॅडी, मम्मी, मला माफ करा' असे शेवटचे शब्द इशिताने मृत्यूपूर्वी ही चिठ्ठीमध्ये लिहिल्याचे निदर्शनास आले आहे. तर स्वतःची जन्मतारीख देखील इशिताने लिहिली होती. त्यामुळे पोलिस याबाबतही अधिक तपास करत आहेत. तिच्या मोबाईल कॉल हिस्टरी आणि इतर तपासाअंती काही गोष्टी आणि मृत्यूचे कारण समजू शकेल असे पोलिसांनी सांगितले आहे.गेल्या वर्षभरात शिवाजी विद्यापीठात विद्यार्थिनीने आत्महत्या करण्याची ही दुसरी घटना आहे. यापूर्वी एम.एससी. विभागातील एका विद्यार्थिनीने असाच गळफास घेऊन टोकाचा निर्णय घेतला होता. विद्यापीठ प्रशासनाने यानिमित्ताने विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देण्याचे आवाहन केले असून, समुपदेशन केंद्राची सुविधा उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले आहे. वसतिगृहातील नियमित तपासणी आणि विद्यार्थ्यांशी संवाद वाढवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. मात्र पुन्हा एकदा घडलेल्या या घटनेमुळे विद्यापीठ वसतिगृहातील सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## कामावरून घरी आला ; काही तासांतच टिप्पर चालकाने टोकाचं पाऊल उचललं

**बीड :** जिल्ह्यामध्ये सध्या आत्महत्येच्या घटनांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये. अशीच एक हृदयद्रावक घटना पाटोदा तालुक्यातील येवलवाडी येथून समोर आली आहे. एका २३ वर्षीय तरुण चालकाने आपल्या राहत्या घरी लोखंडी अँगलला गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. ही घटना रात्री उशिरा घडली असून, यामुळे टेकाळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मुकिंदा आप्पाजी टेकाळे (वय २३ वर्ष) असे मृत तरुणाचे नाव आहे. मुकिंदा हा तरुण एका खाजगी खडी क्रेशरवर टिप्पर चालक म्हणून काम करून आपल्या कुटुंबाला हातभार लावत होता. शुक्रवारी नेहमीप्रमाणे आपले काम संपवून तो रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास घरी परतला. घरी आल्यावर त्याने सर्वांसोबत जेवण केले आणि तो आपल्या खोलीत झोपण्यासाठी निघून गेला. त्यावेळी कोणालाही शंका आली नाही की मुकिंदाच्या मनात काही वेगळेच विचार सुरू आहेत.रात्री ११ वाजेच्या सुमारास मुकिंदाचा भाऊ काही कामासाठी त्याच्या खोलीत गेला असता, त्याला समोर दिसलेले दृश्य अत्यंत धक्कादायक होते. मुकिंदा खोलीतील लोखंडी अँगलला गळफास घेतलेला होता. हे पाहून त्याच्या भावाने आरडाओरडा केला, मात्र तोपर्यंत



मुकिंदाची प्राणज्योत मालवली होती. ऐन विशीत असलेल्या मुलाने असे टोकाचे पाऊल उचलल्याचे पाहून संपूर्ण गावात शोककळा पसरली. घटनेची माहिती मिळताच पाटोदा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाटोदा येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवला. दुपारी शवविच्छेदन झाल्यानंतर मुकिंदाचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. दुपारी शोकाकुल वातावरणात येवलवाडी येथे त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.मुकिंदाने आत्महत्या का केली? याचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. तो कामावरून आल्यावर शांत होता की चिंतेत, याबाबत पोलीस नातेवाईक चौकशी करत आहेत. या प्रकरणाचा अधिक तपास बीट अंमलदार गोरख मिसाळ हे करत आहेत.

## मुंबईमध्ये हत्या प्रकरणांची मालिका ; वडाळ्यात पत्नीला संपवलं, अँटॉप हिलमध्ये २४ वर्षीय तरुणाची बॉडी सापडली

**मुंबई :** मुंबईमध्ये हत्यांचे सत्र थांबताना दिसत नाही. कुर्ला येथे रिक्षात आसनावरून झालेल्या वादातून तरुणाची झालेली हत्या आणि मालवणीत तरुणाने पत्नीला ठार केल्याच्या घटना ताज्या असतानाच अशा आणखी तीन घटना समोर आल्या आहेत. अंधेरीच्या डी. एन. नगर परिसरात १७ वर्षांच्या दोन मुलांनी एका १५ वर्षांच्या मुलाची गळा आवळून हत्या केली. वडाळा येथे दारूसाठी पैसे देत नसल्याने झालेल्या वादातून पतीने पत्नीला अमानुष मारहाण केली. यामध्ये तिचा मृत्यू झाला. तर, अँटॉप हिल परिसरात सेक्टर सातमध्ये एका २४ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हॉटेलमध्ये काम करणारी तीन अल्पवयीन मुले डी. एन. नगर परिसरात भाड्याने खोली घेऊन राहत होते. १५ वर्षांच्या मुलाचे इतर दोघांसोबत वारंवार खटके उडायचे. तो आपल्याबाबत मालकाचे कान भरत असल्याचा दोघांना संशय होता. पैशावरून त्याच्यासोबत भांडण व्हायचे. दोन दिवसांपूर्वी त्याच्यासोबत याच कारणावरून वाद झाला. हा वाद इतका



विकोपाला गेला की दोघांनी या मित्राची गळा दाबून हत्या केली. कुणाला कळू नये म्हणून दोन दिवस खोलीतच मृतदेह ठेवला. अखेर शनिवारी त्यांनी, या मुलाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा बनाव रचला. मात्र पोलिसांच्या तपासात हा बनाव उघड झाल्यानंतर पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले.वडाळा परिसरात राहणाऱ्या महेश वाड याचे दारू पिण्याच्या कारणावरून पत्नी कविता हिच्यासोबत भांडण झाले. दारू पिण्यासाठी पैसे देत नसल्याने महेशने कविता हिला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीमध्ये गंभीर जखमी झालेल्या कविता हिला उपचारासाठी कुठेच नेले नाही. तिच्या घरच्यांना हा प्रकार समजताच त्यांनी कविता हिला रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून महेश याला अटक केली.

# नागपुरात महिला पोलिसांनी हल्लेखोरांची काढली धिंड

**नागपूर :** भाईगिरी आणि गुंडगिरी करणाऱ्या तरुणांच्या योग्यवेळी मुसक्या आवळणं आणि त्यांना योग्य वाटेवर आणणं हे जास्त आवश्यत आहे. अशा तरुणांना वाममार्गातून परत चांगल्या मार्गावर आणण्यासाठी अनेकांकडून प्रयत्न केले जातात. अशा तरुणांच्या आई-वडिलांकडूनदेखील अनेकदा प्रयत्न केले जातात. नातेवाईकांकडूनही प्रयत्न केले जातात. किंवा अनेकदा अशा तरुणांच्या नादी लागायला नको म्हणून कुणीच त्यांना योग्य मार्गाचा सल्ला देत नाही. तर दुसरीकडे अराजकतेच्या दुनियेत प्रवेश केलेल्या तरुणांना आपण काय करतोय याचं भान राहत नाही. ते अनेकदा वाटेल त्याचा जीव घेण्यासही मागेपुढे पाहत नाहीत. तसेच चोरी, हाणामारी, लुटमार सारखे प्रकार करतात.अशाप्रकारचे कृत्य करणारे आरोपी एवढ्यावरच थांबत नाहीत तर परिसरात दहशत माजवण्याचा प्रयत्न करतात. आपल्याबद्दल



परिसरात भीती निर्माण व्हावे यासाठी ते आणखी अराजकतेचा मार्ग निवडतात. अशा तरुणांना वठणीवर आणण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान असते. नागपूरच्या महिला पोलिसांनी अशात तीन तरुणांना वठणीवर आणण्यासाठी एक महत्त्वाचा प्रयत्न केला आहे. गंभीर प्रकारचे गुन्हे करणाऱ्या तिघांची महिला पोलिसांनी ते राहत असलेल्या परिसरातून धिंड काढली आहे. यावेळी आरोपी शरमेने मान खाली घालताना दिसले.नागपुरात विद्यार्थ्यावर जीवघेणा हल्ला केल्या प्रकरणात अटकेतील तीन हल्लेखोरांची शनिवारी सायंकाळी नंदनवन पोलिसांनी धिंड काढली. नंदनवन पोलीस ठाण्यात कार्यरत महिला पोलिसांनी आरोपींची परिसरात धिंड काढली. पोलिसांच्या या कारवाईचे नंदनवनमध्ये कौतुक करण्यात येत आहे. वैभव अशोक तन्नेलवार (वय ३४ रा. वृंदावननगर), संकेत गुलाबराव वंजारी (वय २४ ) आणि तुषार दिलीप पळसापुरे (वय २५, दोन्ही रा. ईडब्ल्यूएस कवेलू क्वॉर्टर) अशी धिंड काढण्यात आलेल्या हल्लेखोरांची नावे आहेत.नोव्हेंबर महिन्यात तिघांनी नंदनवनच्या दत्त मंदिराजवळ वास्तव्यास असलेल्या 21 वर्षीय तरुण नॅव्ही देवेंद्र रामटेके याच्यावर चाकूने वार करून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर तिघांनी सुभाष डेहनकर यांना लुटले. दोन्ही प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. गेल्या तीन महिन्यांपासून हल्लेखोर पसार होते. पोलीस उपायुक्त रश्मिता राव यांच्या मार्गदर्शनाखाली नंदवन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास देशमाने आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गुरूवारी तिघांना अटक केली.धिंड काढून या तिघांच्या दादागिरीचे भूत उतरविण्याचा निर्णय वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास देशमाने यांनी घेतला. महिला पोलीस उपनिरीक्षक प्रतीक्षा पाटील, सविता यादव, अलका ढेंगरे, अर्मिला टोहणे, शीला बिसेन, रूपाली भुंबर,किरण गवई, प्रतिभा इंगोले, प्रियंका डोंगरे, आरती शुक्ला , कांचन परिहार,सोनाली ठाकरे आणि नंदनवन पोलिसांनी शनिवारी सायंकाळी 6 वाजताच्या तीन तीन हल्लेखोरांची निर्मल नगरी, सदभावनानगर आणि नंदनवन झोपडपट्टी परिसरात धिंड काढली.

# हर्षित राणानंतर आणखी एक भारतीय गोलंदाज आयपीएलमधून झाला बाहेर

**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल 2026 च्या आधी कोलकाता नाईट रायडर्सच्या अडचणी कमी होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. हर्षित राणाला आयपीएल स्पर्धेतून दुखापतीचा सामना करत असल्यामुळे स्पर्धेतबन बाहेर पडला आहे. यापूर्वी बांगलादेशच्या मुस्तफिजूर रहमानमुळे प्रकरण तापलेले होते. आता आयपीएलपूर्वी कोलकातासाठी आणखी एक बातमी समोर येत आहे.वेगवान गोलंदाज Akash Deep देखील आयपीएल 2026 मध्ये खेळू शकणार नाही. याचा केकेआरच्या वेगवान गोलंदाजीवर गंभीर परिणाम होणार आहे. श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज मथिशा पाथिरानाचा सहभागही अजून अनिश्चित आहे. हे स्पष्ट आहे की तो सुरुवातीच्या सामन्यांमधून बाहेर असेल. परिणामी, अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील संघाला आगामी हंगामापूर्वी वेगवान गोलंदाजीसाठी बदली खेळाडू शोधावा लागेल.क्रिकबझच्या वृत्तानुसार, आकाश दीप आयपीएल 2026 मध्ये खेळणार नाही. केकेआरच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, तो मैदानाबाहेर आहे आणि



संपूर्ण हंगाम खेळू शकणार नाही. या 29 वर्षीय वेगवान गोलंदाजाला केकेआरने आयपीएल 2026 च्या लिलावात 1 कोटी रुपयांच्या मूळ किमतीत विकत घेतले होते. तो यापूर्वी लखनौ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूरकडून खेळला आहे.देशांतर्गत क्रिकेटमध्ये बंगालकडून खेळणारा आकाश दीप दुखापतींनी त्रस्त आहे. त्याने आतापर्यंत आयपीएलमध्ये 14 सामने खेळले असून, 11.82 च्या इकॉनॉमी रेटने 10 बळी घेतले आहेत. गेल्या हंगामात तो लखनौ संघाचा भाग होता, जिथे त्याने सहा सामने खेळून तीन बळी घेतले. तो अद्याप कोणत्याही हंगामातील सर्व सामने खेळलेला नाही. आकाश 2022 मध्ये आयपीएलमध्ये सामील झाला.जुलै 2025मध्ये इंग्लंड दौऱ्यावरील कसोटी मालिकेदरम्यान आकाश दीप जखमी झाला होता. मँचेस्टरमधील चौथ्या कसोटीतून तो बाहेर पडला होता. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरील कसोटी मालिकेदरम्यानही त्याला दुखापत झाली होती, ज्यामुळे तो तीन महिने मैदानाबाहेर होता. तो आयपीएल 2025 साठी तंदुरुस्त होऊन परतला. गेल्या काही वर्षांपासून आकाश भारतीय कसोटी संघात एक महत्त्वाचा खेळाडू म्हणून उदयास आला आहे. तो जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांच्यासोबत तिसऱ्या वेगवान गोलंदाजाची भूमिका बजावतो.

## पाकिस्तानच्या नाकावर टिच्चून श्रीलंकन कर्णधाराची आयपीएलमध्ये एन्ट्री

**मुंबई/वृत्तसंस्था :** पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची फ्रँचायझी-आधारित टी-20 लीग, पाकिस्तान सुपर लीगचा 11 वा हंगाम 26 मार्च रोजी सुरू होणार आहे, परंतु अनेक परदेशी खेळाडूंनी आधीच माघार घेतली आहे. पीसीबीला आशा होती की सर्व संघांमधील सर्व परदेशी खेळाडू पीएसएल 2026 मध्ये सहभागी होतील. परंतु असे न होता चित्र काही वेगळेच पाहायला मिळत आहे. आता खेळाडू आयपीएलसाठी पीएकएलमधून माघार घेत आहे.आता लीगमधून माघार घेतलेल्यांपैकी एक म्हणजे दसुन शनाका, जो 2026 च्या टी-20 विश्वचषकात श्रीलंकन संघाचे कर्णधारपद भूषवणारा अष्टपैलू खेळाडू आहे आणि आता आयपीएल 2026 मध्ये खेळणार आहे. श्रीलंकेचा कर्णधार दसुन शनाका पीएसएल 2026 मध्ये लाहोर कलंदर्सकडून खेळणार होता, परंतु त्याने वैयक्तिक कारणांमुळे पीएसएलमधून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे.क्रिकबझच्या वृत्तानुसार, सॅम करनच्या जागी राजस्थान रॉयल्सने शनाकाला करारबद्ध केले आहे. राजस्थान रॉयल्सच्या एका अधिकाऱ्याने क्रिकबझला दिलेल्या निवेदनात शनाकाच्या संघात समावेशाची पुष्टी केली आहे. मांडीच्या दुखापतीमुळे संपूर्ण हंगामातून बाहेर झालेल्या अष्टपैलू सॅम करनच्या जागी राजस्थान रॉयल्स बदली खेळाडूच्या शोधात होते. शनाका हा एक योग्य पर्याय आहे. शनाकाबाबत अधिकृतरित्या कोणतेच विधान संघाकडून अजून तरी समोर आलेले नाही.34 वर्षीय दसुन शनाका गेल्या 10 वर्षांपासून आयपीएलमध्ये खेळत आहे. त्याने 2013 मध्ये गुजरात टायटन्सकडून आयपीएलमध्ये पदार्पण केले. शनाकाने आतापर्यंत आयपीएलमध्ये तीन सामने खेळून 26 धावा केल्या आहेत.एकीकडे दासुन शनाका आयपीएल 2026 मध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळणार आहे, तर दुसरीकडे इतर अनेक खेळाडूंनीही आगामी पीएसएल हंगामातून माघार घेतली आहे. त्यांपैकी, पीएसएलचा भाग असलेल्या झिम्बाब्वेच्या ब्लेसिंग मुझारबानीने आयपीएल 2026 मध्ये कोलकाता नाईट रायडर्सकडून खेळण्याचा निर्णय घेतला आहे. याव्यतिरिक्त, या वेळी पीएसएलमध्ये अफगाण खेळाडू खेळताना दिसणार नाहीत.

## फायनलमध्ये गायकवाड वि. सदगीर भिडणार

**पुणे :** पुण्यातील वाघोली येथील 68 व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा आज अंतिम दिवस होता. माती विभाग आणि गादी विभागातील अंतिम फेरीच्या लढती झाल्या आहेत. महाराष्ट्र केसरी २०२६च्या फायनलमध्ये माती विभागातून महेंद्र गायकवाड आणि गादी विभागातून हर्षवर्धन सदगीर यांनी धडक मारली आहे. महाराष्ट्र केसरीची गदा पुन्हा एकदा सदगीर मिळवणार की महेंद्र गायकवाड पहिल्यांदा महाराष्ट्र किताबचा मानकरी ठरणार हे काही मिनिटात समजेलं. माती विभागाच्या अंतिम फेरीची लढत महेंद्र गायकवाड आणि सिकंदर शेख यांच्यात झाली. या लढतीमध्ये महेंद्रने सिकंदरचा ३-० ने पराभव करत महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या फायनलमध्ये धडक मारली. महेंद्र पहिल्या मिनिटात उघडले खाते उघडले होते. त्यानंतर आणखी एक गुण मिळवत महेंद्रने ३-० ने आघाडी घेत ती कायम ठेवली. दुसऱ्या राऊंडमध्ये सिकंदरने पूर्ण प्रयत्न केले पण त्याला काही विजय खेचता आला नाही.गादी विभागाच्या कुस्तीमध्ये नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर याने जयराम पाटील याचा १०-० ने पराभव केला.

## विराटच्या इन्स्टा स्टोरीने फेक बातमीचा पर्दाफाश, प्रकरण काय ?

**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल २०२६ ला सुरूवात होण्यासाठी अवघे काही दिवस बाकी आहेत. यंदाच्या वर्षी पहिला सामना आरसीबी वि. सनरायजर्स हैदराबाद यांच्यात होणार आहे. या सामन्याआधी सोशल मीडियावर स्टार खेळाडू विराट कोहली याची इन्स्टा स्टोरी व्हायरल झाली आहे. विराट कोहलीने फेक बातमीचा पर्दाफाश केला असून त्यामध्ये दोन मागण्यांचा समावेश केलो गेला होता. विराटने ही फेक बातमी आपल्या स्टोरीमध्ये टाकत हसण्याचे इमोजी टाकत पोस्ट केलीय. विराटने आरसीबीच्या संघ व्यवस्थापानाकडे भारत आणि लंडन प्रवासासाठी चार्टर्ड विमान उपलब्ध करून द्यावे. त्यासोबतच जर दोन सामन्यांमध्ये तीन किंवा तीनपेक्षा अधिक वेळ असेल लंडनला जाण्याची परवानगी द्यावी आणि पुढील सामन्याआधी एक दिवस मी परत येईल, रिपोर्टनुसार अशा मागण्या केल्याचं विराट कोहलीने म्हटलं आहे. विराट कोहलीने आपल्या इन्स्टा अकाऊंटला स्टोरीला ठेवत हसण्याचे इमोजी टाकले आहेत.विराट कोहली याने अशी कोणतीही मागणी केली नसल्याचं




आता निश्चित झालं आहे. विराटने आपल्या स्टोरीला टाकल्यावर खोट्या बातमीचा पर्दाफाश झाला आहे. आरसीबीचा पहिला सामना सनरायजर्स हैदराबाद संघासोबत होणार असून आरसीबीच्या होम ग्राऊंडवर म्हणजेच चिन्नास्वामी स्टेडियमवर हा सामना पार पडणार आहे.दरम्यान, मागील वर्षी आरसीबीने विजेतेपदाच्या ट्रॉफीवर नाव कोरलं होतं. आरसीबीला पहिली ट्रॉफी जिंकण्यासाठी १८ वर्ष वाट पाहावी लागली होती. विराट कोहली याने मागील सीझनमध्ये १५ सामन्यांमध्ये ५४.७५ च्या सरासरीने ६५७ धावा केल्या होत्या. ज्यामध्ये आठ अर्धशतकांचा समावेश होता. आरसीबीसकडून सर्वाधिक धावा करणारा तो पहिला खेळाडू ठरला होता.

# युवा खेळाडू प्रशांत वीरचा फॅन झाला धोनी ; बॅटिंग पाहून दिली भन्नाट रिॲक्शन ; सराव सत्रातील व्हिडिओ व्हायरल

**मुंबई/वृत्तसंस्था :** आता आयपीएलला लवकरच सुरुवात होणार आहे. 28 मार्च 2026 पासून आयपीएलला सुरुवात होईल. पहिला सामना हा सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्समध्ये रंगणार आहे. आयपीएलपूर्वी प्रत्येक संघ जोमात सराव करताना दिसत आहे. संघाचा सराव सत्रातील व्हिडिओ सोशल मीडियीवर व्हायरलही होत आहे. आता एक व्हिडिओ व्हायरल होत आहे ज्यात महेंद्र सिंग धोनी एका युवा खेळाडूचा फॅन झाल्याचे दिसथ आहे.भारताचा माजी कर्णधार Mahendra singh Dhoni सहसा खेळाडूंचे सहज कौतुक करत नाही, म्हणूनच जेव्हा तो Chennai Super Kings सराव सत्रादरम्यान युवा अष्टपैलू खेळाडू प्रशांत



वीरच्या फलंदाजीचे कौतुक करताना दिसला, तेव्हा ते खूपच खास ठरले. आयपीएल 2026 च्या लिलावात, चेन्नई सुपर किंग्सने प्रशांत वीरसाठी ₹14.20 कोटींची मोठी बोली लावली, ज्यामुळे तो संघातील सर्वाधिक मागणी असलेल्या खेळाडूंपैकी एक बनला. परिणामी, प्रत्येक सराव सत्रावर आणि प्रत्येक कामगिरीवर सर्वांच्या नजरा खिळल्या आहेत. चेन्नईने सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका सरावाच्या व्हिडिओमध्ये, प्रशांत वीर नेटमध्ये फलंदाजी करताना दिसला, तर एमएस धोनी यष्टीमागे उभा होता. वीरने ऑफ साइडला एक शानदार फटका मारताच, धोनीची प्रतिक्रिया होती, 'शॉट.'

त्यानंतर वीरने एक अप्रतिम स्कूप आणि मग एक स्ट्रेट ड्राइव्ह मारला, आणि प्रत्येक फटक्यावर धोनीने त्याच पद्धतीने त्याचे कौतुक केले. हा व्हिडिओ केवळ चांगल्या फटक्यांबद्दल नाही, तर तो आत्मविश्वासाबद्दलही आहे.धोनीकडून मिळालेली एक छोटीशी प्रशंसासुद्धा तरुण खेळाडूंसाठी एक महत्त्वपूर्ण बाब मानली जाते. यामुळे केवळ त्यांचा आत्मविश्वासच वाढत नाही, तर संघात आपले स्थान आहे हा त्यांचा विश्वासही दृढ होतो. प्रशांत वीरसाठी हे आणखी महत्त्वाचे आहे, कारण त्याच्या मोठ्या किंमतीमुळे त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा ठेवल्या गेल्या आहेत. नेट्समधील त्याच्या फटक्यांनी दबाव हाताळण्याची त्याची क्षमता निश्चितपणे दाखवून दिली.

प्रशांत वीरने अलीकडेच उघड केले आहे की, त्यांच्या पहिल्या संभाषणादरम्यान धोनीने त्याला क्रिकेटवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी जीवनात संतुलन साधण्याचा आणि जमिनीवर पाय ठेवून राहण्याचा सल्ला दिला होता.

# प्रिया बापट उमेश कामात पुन्हा येणार एकत्र

मराठी मनोरंजनाचे प्रमुख ठिकाण असलेल्या मराठी ZEE5 ने आपल्या आगामी 'हे काय नवीन?' या ओरिजनल सिरीजचा ट्रेलर प्रसिद्ध केला. या सिरीजमध्ये उमेश कामतने आदित्य आणि प्रिया बापट हिने रमाची भूमिका साकारली असून वरुण नार्वेकर यांनी दिग्दर्शित केलेली ही मालिका एक हृदयस्पर्शी, संबंधित जीवन नाट्य सादर करते. जोडप्यांनी आयुष्यातील प्रमुख टप्पे पार केल्यावर काय घडते याचा शोध घेत केवळ त्यांचा प्रवास त्यांच्या सभोवतालच्या लोकांसारखा दिसत नाही हे लक्षात येण्यासाठी. शुभांगी गोखले, उदय टिकेकर, सुयोग गोऱ्हे, राजसी भावे, ओंकार गोवर्धन, तन्वी कुलकर्णी आणि पायल जाधव यांच्यासह इतर कलाकारांचा समावेश असलेली 'हे काय नवीन?' सिरीज 31 मार्च रोजी मराठी ZEE5 वर प्रदर्शित होणार आहे.प्रतिसाद प्रॉडक्शन्स आणि बहावा एंटरटेनमेंट निर्मित, 'हे काय नवीन?'चे कथासूत्र रमा आणि आदित्यभोवती फिरते. एक आधुनिक, आयुष्यात सेटल झालेले जोडपे ज्यांनी समोर आलेला प्रत्येक प्रश्न सोडवला आहे. एक उबदार घर, स्थिर कारकीर्द, पाठीशी भक्कमपणे उभे असलेले कुटुंब तसेच 10 वर्षांच्या निवांत आणि समजूतदारपणावर उभं असलेलं लग्न. पण जेव्हा ते एका नवीन




अध्यायात प्रवेश करतात, तेव्हा त्यांच्यात एक अनपेक्षित प्रश्नाचा हुंकार होऊ लागतोः 'हॅप्पीली एव्हर आफ्टर'?आपल्या दैनंदिन जीवनचक्रातून विसावा म्हणून रमा सबॅटिकल घ्यायचे ठरवते. स्वतःला क्रिएटिव्ह वेंचरमध्ये झोकून देते. छोटेखानी, स्वतः सुरू केलेली क्लोदिंग लाईन! अगदी वेळ घालविण्याचा छंद म्हणून सुरू केलेल्या प्रवासाला अर्थपूर्ण वळण लागते. प्रयोगापोटी झालेली सुरुवात काळजी, निकड आणि असुरक्षिततेसह संगोपन करणारे काहीतरी बनते... एक असा प्रकल्प जो 'बाळा'सारखा वाटतो. ज्यासाठी तिने कधीही योजना आखली नसते, परंतु अचानक दुर्लक्षही करू शकत नाही.जसजशी नवीन मैत्री, बदलणारे आयाम आणि इतर प्रत्येकाच्या "परिपूर्ण कालमयदिचे" वजन तिच्या जगावर प्रभाव टाकू लागते, तसतसे हे जोडपे त्यांच्या बंधांची चाचणी अशा मार्गांनी घेण्याचे पर्याय शोधतात, जे अपेक्षित नाहीत. विनोद, उबदारपणा आणि तीक्ष्ण भावनिक अंतर्दृष्टी यांचे मिश्रण असलेली ही सिरीज ओळख, आपली मूळं घट्ट करणारी महत्त्वाकांक्षा, भागीदारी आणि जीवन बाहेरून 'पूर्ण' दिसत असताना समोर येणाऱ्या अघोषित चिंतांचा शोध घेते.ओरिजनल सिरीजबद्दल बोलताना हेमा व्ही. आर., चीफ चॅनेल ऑफिसर - झी मराठी आणि बिझनेस हेड- मराठी ZEE5, म्हणाल्या, "मराठी ZEE5 मध्ये, आमच्या प्रेक्षकांचे जीवन, नातेसंबंध आणि उत्क्रांत प्रवास खरोखर प्रतिबिंबित करणाऱ्या कथा जिंकण्याचा आमचा प्रयत्न आहे. 'हे काय नवीन?'मध्ये अनेक जोडपी या टप्प्यातून जातात, परंतु क्वचितच व्यक्त होतात. बदलत्या प्राधान्यांनी भरलेली जागा, बदलत्या भावना, ओळखी भोवतीचे मिड लाईफ क्रायसीस आणि भागीदारीचे शांत पुनर्संचयन. दैनंदिन क्षणांमध्ये आणि प्रामाणिक संभाषणात रुजलेली ही सिरीज, पिढ्यानपिढ्या आणि भौगोलिकदृष्ट्या प्रतिध्वनित होणाऱ्या अस्सल कथा सादर करण्याची आमची बांधिलकी अधिक दृढ करते.

अतिशय प्रतिभावान आणि खऱ्या आयुष्यात एकमेकांचे जोडीदार, प्रिया बापट आणि उमेश कामत यांनी जिवंत केलेल्या आणि दिग्दर्शक वरुण नार्वेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या या अस्सल कौटुंबिक नाट्याचा धागा कुठूनही सिरीज पाहणाऱ्या प्रेक्षकांशी हृदयस्पर्शी बंध निर्माण करेल असा आम्हाला विश्वास आहे."स्व-अनुभव सांगताना प्रिया बापट पुढे म्हणाली, "रमाची व्यक्तिरेखा ही अनेक स्त्रियांना आपलीशी वाटेल. ती विलक्षण आहे म्हणून नव्हे, तर ती सच्ची आहे याकरिता! जेव्हा महत्त्वाकांक्षा, ओळख आणि जबाबदारीची टक्कर होते तेव्हा अनेक महिलांना भेडसावणाऱ्या भावनिक संधींचे ती प्रतिनिधित्व करते. रमा साकारताना दीर्घकालीन नातेसंबंधांमध्ये आपण अनेकदा सोडवत असलेल्या शांत प्रश्नांचा शोध घेण्यास मदत झालीः 'मला पुढे काय हवे आहे?' आणि 'माझ्या स्वतःच्या कथेत मी कुठे आहे?' ही सिरीज त्या असुरक्षिततेला जागा देते, जी अपराधीपणाशिवाय उद्देश शोधते. अशा कंगोरे असलेल्या कथेसाठी माझा विचार केल्याबद्दल मी ZEE5 ची आभारी आहे आणि प्रेक्षकांना ही कथा प्रामाणिकपणे अनुभवता यावी यासाठी उत्सुक आहे."आपल्या भूमिकेबद्दल बोलताना उमेश कामत म्हणाला, "हे काय नवीन'ने किती वास्तववादी पद्धतीने विवाहाच्या अशा टप्प्याचे चित्रण केले, ज्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. मला हा प्रयत्न आवडला आदित्यचा प्रवास सूक्ष्म, अनेक पैलू असलेला आणि भावनिकदृष्ट्या समृद्ध आहे. मराठी ZEE5 ही संबंधित पात्रे आणि अर्थपूर्ण कथा सादर करण्यासाठी ओळखली जाते आणि अशा संवेदनशीलतेने आणि प्रामाणिकपणे दैनंदिन नातेसंबंध प्रतिबिंबित करणाऱ्या सिरीजचा भाग असल्याचा मला आनंद आहे."

# अनुष्का शर्मा अल्लू अर्जुनच्या तेलुगू सिनेमात साकारणार भूमिका? दीपिका पादुकोणही झळकणार

अल्लू अर्जुन त्याच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. अभिनेत्याच्या आगामी चित्रपटाचं नाव AA22xA6 असल्याचं म्हटलं जातंय. पण, नंतर हे नाव बदललं जाईल. या चित्रपटाचं दिग्दर्शन अ‍ॅटली करत असून वृत्तानुसार, या चित्रपटात अनेक मोठे कलाकार दिसणार आहेत.दीपिका पादुकोण मुख्य अभिनेत्री म्हणून काम पाहणार आहे. वृत्तानुसार, अनुष्का शर्मालाही या चित्रपटात कास्ट करण्यात आलंय. हा एक सायन्स फिक्शन चित्रपट असणार आहे. डेक्कन क्रॉनिकलमधील एका वृत्तानुसार, आणखी एक आघाडीची बॉलिवूड अभिनेत्री या चित्रपटात काम करणार आहे. सध्या अनुष्कासोबत चित्रपटसंदर्भात चर्चा सुरू आहे आणि जर अभिनेत्रीनं होकार दिला, तर हा तिचा पहिला तेलुगू चित्रपट असेल. पण, अद्याप कोणतीही अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. अनुष्का शर्मा शेवटची शाहरुख खानच्या 'झीरो'मध्ये दिसली होती. या चित्रपटात अनुष्का आणि कतरिना कैफ एकत्र दिसल्या होत्या. अनुष्का शर्मा चित्रपटांमध्ये निर्माती म्हणून काम करत असल्यामुळे, तिच्या



अभिनयाच्या प्रोजेक्टबद्दल कोणतीही बातमी आलेली नाही. २०२२ मध्ये, भारतीय महिला क्रिकेटपटू झुलन गोस्वामी यांच्या जीवनावरील 'चकदा एक्सप्रेस' या बायोपिकमध्ये ती दिसणार असल्याच्या बातम्या होत्या.मात्र, गेल्या काही दिवसांपासून हा चित्रपट रद्द झाल्याच्या बातम्या पसरत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, अनुष्का शर्मा तिचा पती विराट कोहली आणि त्यांच्या मुलांसोबत लंडनमध्ये राहतेय.दरम्यान, अल्लू अर्जुनच्या 'AA22xA6' या चित्रपटाबद्दल बोलायचं झाल्यास, यात मृणाल ठाकूर, जान्हवी कपूर आणि रश्मिका मंदाना यांच्यासह अनेक अभिनेत्री दिसणार आहेत. त्याचबरोबर, रश्मिका मंदाना या चित्रपटात नकारात्मक भूमिकेत दिसणार आहे. अल्लू अर्जुन या चित्रपटात अनेक वेगवेगळ्या भूमिका साकारताना दिसणार असल्याचंही सांगितलं जातंय. या चित्रपटाचं संगीत साई अभ्यंकर देणार आहेत. अ‍ॅटलीसोबत काम केल्यानंतर, अल्लू अर्जुन 'AA23' साठी लोकेश कनगराजसोबत काम करणार असून, या चित्रपटाचं संगीत प्रसिद्ध संगीतकार अनिरुद्ध यांनी दिलं आहे. या चित्रपटाचं शूटिंग २०२६ मध्ये सुरू होणार आहे.

# शिव ठाकरे बनवा 'द ५०' चा विजेता ; फैजूला हरवून ट्रॉफीवर कोरलं नाव

सध्या सर्वत्र 'द ५०' (The 50 ) शोची चर्चा पाहायला मिळत आहे. 'द ५०' शोचा ग्रँड फिनाले थाटामाटात पार पडला आहे. या शोचे लाखो चाहते आहेत. या ग्रँड शोचा विजेता महाराष्ट्राचा लेक शिव ठाकरे (Shiv Thakare ) ठरला आहे. शिवने 'द ५०' ची ट्रॉफी उचलली आहे. ट्रॉफीसोबत शिव ठाकरेला तब्बल 50 लाख रुपयांचे बक्षीस मिळाले आहे. मात्र शिवने हे बक्षीस त्याच्या चाहत्यासाठी जिंकले आहे.



ग्रँड फिनालेला शिव ठाकरेला 'द ५०' या शो चा विजेता म्हणून घोषित करण्यात आले. मिस्टर फैसू, काका, रजत दलाल आणि कृष्णा श्रॉफ यांच्याशी स्पर्धा करून शिवने विजेतेपदाची ट्रॉफी पटकावली. चाहते आणि कलाकार सोशल मीडियावर शिव ठाकरेला शुभेच्छा देताना दिसत आहेत. या विजयासह, रिॲलिटी शोच्या विश्वात आपली भक्कम फॅन फॉलोइंग आणि लोकप्रियता त्याने पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. 'द ५०' शो जिंकल्यानंतर शिव ठाकरेने चाहत्यांचे आभार मानले. शिवने सांगितले की, "हा विजय जितका माझा आहे, तितकाच तो माझ्या चाहत्यांचाही आहे आणि मला विशेष आनंद या गोष्टीचा होत आहे की, माझ्या चाहत्यांपैकीच एक जण ५० लाख रुपयांचे बक्षीस आपल्या घरी घेऊन जाणार आहे. खूप खूप धन्यवाद!" शिव ठाकरेला आता चाहते 'रिॲलिटी शो किंग' म्हणत आहेत. मीडिया रिपोर्ट्नुसार, 'द ५०' शोचा पहिला उपविजेता सोशल मिडिया स्टार मिस्टर फैजू आहे. तर फिटनेस क्वीन कृष्णा श्रॉफने 'द ५०' ची दुसरी रनर-अप ठरली आहे. रिॲलिटी शो 'द ५०' ची सुरुवात टिव्ही, सोशल मीडिया, क्रीडा, मनोरंजन इत्यादी क्षेत्रातील ५० स्पर्धकांनी केली. शोच्या स्पर्धकांमध्ये करण पटेल, फैसल शेख, दिव्या अग्रवाल, रिद्धी डोगरा, शिव ठाकरे, प्रिन्स नरुला, उर्वशी ढोलकिया, कृष्णा श्रॉफ, नेहल राज लवमा, नेहल इत्यादी लोकप्रिय चेहरे दिसले.

# धुरंधर २ ने रचला इतिहास, ३ दिवसांमध्ये कमाई ४०० कोटी पार

राज्यात सध्या धुरंधर चित्रपटाने धुमाकूळ घातला आहे. या चित्रपटाने पहिल्याच दिवशी मोठ्या प्रमाणात कमाई करून इतिहास रचला आहे. या चित्रपटाने शाहरुखच्या जवान आणि KGF2 चित्रपटाला मागे टाकलं आहे.

दिग्दर्शक आदित्य धर यांचा स्पाय-अ‍ॅक्शन चित्रपट धुरंधरः द रिवेंज सध्या प्रेक्षकांच्या चर्चेचा विषय ठरत आहे. चित्रपटगृहांपासून सोशल मीडियापर्यंत या चित्रपटाची जबरदस्त क्रेझ पाहायला मिळत असून प्रेक्षकांकडूनही उत्तम प्रतिसाद मिळत आहे.चित्रपटाने रिलीजपूर्वीच अ‍ॅडव्हान्स बुकिंगमध्ये मोठी कमाई करत आपली ताकद दाखवली होती. त्यानंतर आता रिलीज झाल्यानंतरही बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. विशेष



म्हणजे बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंहच्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर प्रदर्शित झाल्यानंतर दररोज नवे विक्रम प्रस्थापित करत जुन्या रेकॉर्डना मागे टाकण्याची कामगिरी सुरू ठेवली आहेधुरंधर 2' चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर पहिल्या शनिवारी चित्रपटाच्या कमाईत मोठी झेप पाहायला मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार, संध्याकाळी 6 वाजेपर्यंत चित्रपटाने सुमारे 77 कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला होता. या वेगवान कमाईच्या पार्श्वभूमीवर अंतिम आकडेवारी 100 कोटी रुपयांचा आकडा सहज पार करेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता.

चित्रपटातील दमदार अ‍ॅक्शन सीक्वेन्स, थरारक कथानक आणि रणवीर सिंहची ऊर्जा यामुळे प्रेक्षक मोठ्या संख्येने चित्रपटगृहांकडे आकर्षित होत आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये या चित्रपटाची कमाई अशाच वेगाने वाढत राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, या चित्रपटाच्या अंतिम कमाईचे अधिकृत आकडे अद्याप समोर आले नसले तरी या चित्रपटाची क्रेझ पाहता हा चित्रपट मोठ्या प्रमाणात कमाई करताना दिसत आहे.

19 मार्च रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झालेल्या 'धुरंधर 2' ने पहिल्याच दिवशी प्रचंड कमाई केली आणि जगभरात या चित्रपटाच्या कमाईची चर्चा झाली. प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशी, शनिवारी चित्रपटाने 113.02 कोटींची कमाई केली. ज्यामुळे भारतातील त्याची एकूण कमाई 339.29 कोटींवर पोहोचली आणि एकूण कलेक्शन 404.56 कोटी झाले. यापूर्वी चित्रपटाने प्रीमियरमधून 43 कोटी रुपयांची कमाई केली आहे. आज देखील या चित्रपटाच्या कमाईमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. रविवार असल्यामुळे थिएटरमध्ये हा चित्रपट पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात चाहते गर्दी करत असताना दिसत आहेत.

# चमकदार जाहिरातींचा काळा खेळ उघड!

# शुगर फ्री म्हणत विकला जातो साखरेचा सापळा!

## सरकार ॲक्शन मोडमध्ये 10 लाख दंड ठोकला!

जनसंचलन/बुलढाणा

आकर्षक पॅकेजिंग, मोठमोठे दावे आणि चमकदार जाहिरातींमागे लपलेला खाद्यपदार्थ कंपन्यांचा खोटेपणा आता उघड झाला आहे. ग्राहकांना एक दाखवून दुसरेच विकण्याचा घातक प्रकार राज्यभर समोर येत असून, यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ केला जात आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत राज्य सरकारने कठोर पाऊल उचलत अशा कंपन्यांवर तब्बल १० लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावण्याचा इशारा दिला आहे. तपासणीत धक्कादायक बाब समोर आली आहे. अनेक खाद्यपदार्थांच्या पाकिटांवर दाखवलेले घटक प्रत्यक्षात अत्यल्प प्रमाणात किंवा नावापुरतेच असल्याचे उघड झाले आहे. ङ्गहेल्दीफ, ङ्गनॅचरलफ, ङ्गशुगर फ्रीफ अशा भ्रामक दाव्यांमुळे ग्राहकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे. यामुळे लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याचा धोका वाढला आहे. अन्न व औषध प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला आहे की, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि चुकीची माहिती देणाऱ्या कंपन्यांना अजिबात सूट दिली जाणार नाही. ङ्गमिसब्रँडेड फूडफ्च्या नावाखाली चालणारा हा धंदा आता बंद केला जाणार असून, दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई अटळ आहे. दरम्यान, ङ्गहॅलो बुलढाणाफ्तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, खाद्यपदार्थ खरेदी करताना फक्त जाहिरातींवर विश्वास ठेवू नका. पाकिटाच्या मागील बाजूस दिलेली पोषणमूल्ये, घटक आणि उत्पादनाची तारीख नीट तपासा. संशयास्पद उत्पादने आढळल्यास त्वरित तक्रार नोंदवा. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांची आता खैर नाही! सरकारच्या या निर्णयामुळे फसवणूक करणाऱ्या कंपन्यांचे धाबे दणाणले असून, येणाऱ्या काळात अन्नसुरक्षेच्या बाबतीत मोठी स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे.

# खिशातून ७ हजार लंपास; आरोपी अटकेत

जनसंचलन/मोताळा



खिशातून सात हजार रुपये हिसकावल्याची घटना २० मार्च रोजी घडली. बोराखेडी पोलिसांनी २१ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून तातडीने गुन्हा दाखल करून काही तासातच आरोपींना जेरबंद केले. नांदुरा तालुक्यातील खडदगाव येथील मंगेश सुनील घोगले यांनी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास मलकापूरकडे जाताना दोघांना दुचाकीवर बसवले. काही अंतरावर नकळत त्यांचे खिशातील सात हजार रुपये हिसकावले गेले. चिंचपूर फाट्याजवळ दुचाकी थांबवून आरोपी पळून गेले. पोलिस तपास पोहेकॉ कपिश काशपाग यांच्याकडे असून, पीएसआय राजेंद्र कपले, पोहेकॉ नंदकिशोर धांडे व पोकॉ ज्ञानेश्वर धामोडे यांच्या सहकार्याने तांत्रिक मदतीने शंकर श्रीराम चव्हाण (रा. मोताळा) व अमजद शाह कादर शाह (जामनेर) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्हा कबुल केला. पोलिसांनी त्यांच्याकडून चोरी केलेले सात हजार रुपये आणि दुचाकी जप्त केली आहे. पुढील तपास बोराखेडी पोलिस करत आहेत. दरम्यान सदर परिसरात चोरट्यांचा हैदोस वाढला असून पोलिसांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

# मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत खेळाडू निवड चाचणी ५ एप्रिलला

जनसंचलन/बुलढाणा

मिशन लक्ष्यवेध

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या मिशन लक्ष्यवेध योजना अंतर्गत जिल्हास्तर क्रीडा निपुणता केंद्रासाठी खेळाडू निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही चाचणी दि. ५ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे होणार आहे. या योजनेअंतर्गत बुलढाणा येथे वेटलिफ्टिंग व मैदानी (ॲथलेटिक्स) या क्रीडा प्रकारांसाठी निवासी स्वरूपाचे क्रीडा निपुणता केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, अल्पोहार तसेच क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य शासन मान्यतेनुसार उपलब्ध करून दिले जाणार आहे. जिल्ह्यातील पात्र व गुणवंत खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने ही निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे. इच्छुक खेळाडूंनी दि. १ एप्रिल २०२६ सायंकाळी ६ वाजेपर्यंत निर्धारित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा. निवड निकष : खेडाळू हा ३१ डिसेंबरपर्यंत २१ वर्षांखालील मुलगे/मुली, महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असणे आवश्यक, राज्यस्तरीय पदक विजेते किंवा राष्ट्रीय स्तरावर सहभागी खेळाडू गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक व शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य राहिल. आवश्यक कागदपत्रे: जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, क्रीडा कामगिरी प्रमाणपत्र, ३ फोटो, बोनाफाईड प्रमाणपत्र, पालक संमतीपत्र इत्यादी. अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रांचा तपशील ://./६९९ या लिंक मध्ये उपलब्ध असून इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा ४४३००१ येथे सादर करावा. तसेच अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. निवड प्रक्रिया शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार तज्ज्ञ समितीद्वारे करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाव्दारे जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी दिली.

# गॅस दरवाढीविरोधात उद्धवसेना आक्रमक

# जिल्ह्यातील काळाबाजार थांबविण्याची मागणी...

जनसंचलन/बुलढाणा

राज्यात घरगुती व व्यावसायिक गॅसचा तुटवडा आणि दरवाढ याविरोधात उद्धवसेना महिला आघाडीने आक्रमक भूमिका घेतली आहे. तालुकास्तरावरील पदाधिकाऱ्यांनी शुक्रवार, दि.२० मार्च रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करून तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली. निवेदनानुसार, सणासुदीच्या काळातही गॅसचा गंभीर तुटवडा निर्माण झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. गुढीपाडवा व रमजानच्या पार्श्वभूमीवर सिलिंडर बुकिंगनंतर वेळेवर ओटीपी न मिळणे, बुकिंग प्रक्रिया विस्कळीत असणे यामुळे नागरिकांना तासनतास प्रतीक्षा करावी लागत असूनही गॅस मिळत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. दरम्यान, अधिकृत प्रक्रियेत गॅस उपलब्ध नसताना अतिरिक्त रक्कम दिल्यास सहज सिलिंडर मिळत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. या प्रकारातून मोठ्या प्रमाणावर काळाबाजार सुरू असल्याचा मार्च रोजी जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन बाधित आरोप करत सामान्य नागरिकांची आर्थिक लूट होत असल्याचे महिला आघाडीने नमूद केले आहे. गॅस पुरवठा सुरळीत करणे, बुकिंग प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, काळाबाजार रोखण्यासाठी कठोर कारवाई करणे आणि व्यावसायिकांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी करीत शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलनाचा इशाराही महिला आघाडीने दिला आहे. यावेळी अनिता जाधव, अर्चना शेळके आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# खासगी बस-ऑटोची धडक; महिला ठार

जनसंचलन/ जळगाव जामोद

तालुक्यातील आसलगाव येथे रविवारी (दि. २२) सायंकाळी ६:३० वाजताच्या सुमारास खासगी बस-ऑटोचा भीषण अपघात झाला. या अपघातात ऑटोतील एका महिलेचा मृत्यू झाला असून, पाचजण जखमी झाले घटनेनंतर आहेत. या संतप्त जमावाने खासगी बसची तोडफोड करत चालकाला मारहाण केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जळगाव जामोद येथून पुण्याकडे जाणारी खासगी बस क्रमांक (जीजे १४ डब्ल्यू ०५४१) ही आसलगाव येथील नांदुरा रोडवरील धान्य मार्केटसमोर आली असता, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. यावेळी समोरून येणाऱ्या ऑटोला क्रमांक (एमएच १९ बीजे २८२५) बसने जोरदार धडक दिली. या अपघातात ऑटोमधील जयश्री किसन उद्धट (३८, रा. आसलगाव) यांचा जागीच मृत्यू झाला, तर ऑटोचालक गजानन सोळंके, गोपाल किसन उद्धट, वंदना अनिल मेहंगे, नंदा प्रकाश डाबेराव व मंगला भीमराव लोथीया हे जखमी आहेत. जण अपघातात जखमी झाले असून, खामगावात उपचार सुरू आहेत. घटनास्थळी मोठी गर्दी जमली. यावेळी संतप्त झालेल्या नागरिकांनी खासगी बसवर दगडफेक करत काचा फोडल्या तसेच चालकाला मारहाण केली. घटनेची माहिती मिळताच ठाणेदार नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अमोल पंडित, भागवत उंबरहंडे व पथकाने घटनास्थळी जात परिस्थिती नियंत्रणात आणली. वृत्त लिहीपर्यंत या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# गॅस टंचाईचा लग्नसराईवर घाला! मुहूर्त मर्यादित आता पर्यायच एकमेव आधार!

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात लग्नसराईचा हंगाम सुरू असतानाच व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या टंचाईने मोठे संकट निर्माण झाले आहे. विवाह सोहळ्यांचे नियोजन धोक्यात आले असून मंगल कार्यालय चालक, केटरर्स आणि पालकांमध्ये तीव्र अस्वस्थता पसरली आहे. मार्च ते जुलैदरम्यान अवघे ३० मुहूर्त उपलब्ध असल्याने वेळ चुकल्यास थेट २०२७ पर्यंत प्रतीक्षा करण्याची वेळ येणार आहे. मध्य पूर्वेतील तणावामुळे देशभरात गॅस पुरवठ्यावर परिणाम झाल्याची चर्चा रंगली असून बुलढाण्यातही त्याचे पडसाद उमटू लागले आहेत. काही ठिकाणी घरगुती सिलिंडरसाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहेत. यामुळे केटरींग व्यवसाय अडचणीत सापडला आहे. दरम्यान, प्रशासनाने घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा देत तपासणी मोहीम सुरू केली आहे. परिणामी, मंगल कार्यालयांनी डिझेल शेगड्या, लाकडी चुली यांसारख्या पर्यायांकडे वळण्यास सुरुवात केली आहे.



बुकिंग रद्द नाही, कोणत्याही परिस्थितीत लग्न पार पडणारच!फ़फ़ अशी ठाम भूमिका व्यावसायिकांनी घेतली आहे. मात्र, परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधी प्रशासनाने तातडीने गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

# आरोग्य केंद्रातील बंद खोलीला आग

**जनसंचलन/ पिंपळगाव राजा**

येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जुन्या इमारतीतील बंद खोलीला २२ मार्च रोजी सकाळी ८ ते ९ वाजताच्या दरम्यान अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत खोलीत ठेवलेले जुने रेकॉर्ड जळून खाक झाल्याची माहिती आहे. माहितीनुसार, पिंपळगाव राजा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन इमारतीत स्थलांतरित करण्यात आले असून, जुन्या इमारतीत अनेक वर्षांपासूनचे कागदपत्रे व नोंदी साठवून ठेवण्यात आल्या होत्या. सध्या या इमारतीत आशा स्वयंसेविकांच्या कार्यशाळा, बैठका आदी उपक्रम सुरू असतात. दरम्यान, रविवारी धुळखात पडलेल्या बंद खोलीत अचानक आग लागल्याचे आढळून आले. घटनेची माहिती मिळताच येथील आरोग्य कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. हाफिजा यांना कळविले. त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. दरम्यान, ग्रामस्थांनीही आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला; मात्र तोपर्यंत खोलीतील जुने रेकॉर्ड पूर्णपणे जळून खाक झाले होते. या घटनेची नोंद पिंपळगाव राजा पोलिस ठाण्यात करण्यात आली.





पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001



आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा



बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..

| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९११३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४